# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः04.08.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. देशातील अन्नधान्य विविधता जगासाठी आशेचा किरण असल्याचा पंतप्रधानांचा विश्वास, बत्तिसाव्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचा नवी दिल्लीत आरंभ
2. पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेला महाराष्ट्रासह सहा राज्यांमधील परिसर ‘पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यासाठी नवीन मसुदा अधिसूचना
3. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात संततधार पावसामुळं धरणं भरली, नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा
4. केरळमधील मृतांचा शोध अंतिम टप्प्यात, आता पुनर्वसनाकडे लक्ष

आणि

5. पॅरीस ऑलिंपिकमध्ये बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन पदक फेरीत जाण्याची अपेक्षा

**मोदी अर्थपरिषद**

भारतात मुबलक अन्नधान्य उपलब्ध असून, जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित करण्यात आलेल्या 32 व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. यावर्षीच्या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेनं परिवर्तन’ अशी आहे. सरकार कृषी क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी विविध सुधारणा आणि उपाययोजना करत असून, शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा व्यापक हेतू त्यामागे आहे. कृषिक्षेत्र भारत सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी आहे, असं ते म्हणाले. भारत भरडधान्य, तृणधान्यं आणि मसाल्यांचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. देशातील अन्नधान्य विविधता, जगासाठी आशेचा किरण असून जगापुढील अन्नसुरक्षेच्या समस्यांचं निराकरण भारत संपूर्ण क्षमतांनिशी करत आहे, असंही त्यांनी सांगितलं. परिषदेत 75 देशांचे एक हजारपेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**कृषी**

कृषी अर्थशास्त्रज्ञांच्या बत्तीसाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी आलेल्या परदेशी प्रतिनिधींनी भारताच्या कृषी क्षमता आणि एकंदर वाढीचं कौतुक केलं आहे. 6 दिवसांच्या या कार्यक्रमात प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा सहभाग असून भारताची कृषी क्षेत्रातली कामगिरी आणि नवकल्पनांची त्यांनी प्रशंसा केली.

**राज्यपाल परिषद**

राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचा काल राष्ट्रपती भवनात समारोप झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याच्या भावनेनं सर्वसमावेशक चर्चा करण्याच्या राज्यपालांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं.राज्यपालांच्या कार्यालयाचं कामकाज सुधारण्यासाठी तसंच लोककल्याणासाठी मिळालेल्या मौल्यवान विचार आणि सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल असं त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात सांगितलं. आदर्श राज्याचं उदाहरण प्रस्थापित करणं ही राज्यपालांची जबाबदारी असून प्रभावी कामकाजासाठी राज्यपालांनी संबंधित राज्य सरकारांशी सतत संवाद साधावा असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड  यांनी यावेळी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यपालांना राजभवनात शासनाचं आदर्श मॉडेल विकसित करण्याचं  आवाहन केलं .

**सेंद्रीय**

येत्या 8 वर्षात भारत 20 टक्के क्षेत्र, सेंद्रिय शेतीखाली आणू शकतो अशी माहिती नीती आयोगाचे सदस्य आणि कृषी अर्थशास्त्रज्ञांच्या, आंतरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष प्राध्यापक रमेश चंद यांनी आकाशवाणीला दिली. नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीमध्ये विज्ञानाचा वापर केल्यानं शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होऊ शकते असं त्यांनी सांगितलं.

**अधिसूचना**

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेला महाराष्ट्रासह सहा राज्यांमधील 56800 चौरस किलोमीटरपेक्षा जास्त परिसर ‘पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारनं नवीन मसुदा अधिसूचना जारी केली आहे.  महाराष्ट्रासह  गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं  जनतेकडून येत्या साठ दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम, पायाभूत सुविधांचा विकास यासाठी मोठ्या प्रमाणात कामं करण्यावर बंधनं येणार असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**पुणे-पुर**

महाराष्ट्रात, पुणे जिल्ह्यातील खडकवासला, पवना, मुळशी, चासकमान धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत असून धरणं पूर्ण क्षमतेनं भरली आहेत. या धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु करण्यात येत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरातील नद्यांच्या पूररेषेलगतच्या तसेच कोयना धरणातूनही मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु असल्यानं कृष्णाकाठच्या गावातील, पुररेषेलगत आणि सखल भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचं आणि त्यांचं सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्त, संबधित जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत. नागरिकांनीही स्वत:च्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन पवार यांनी केलं आहे.

भारतीय हवामान खात्यानं पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी अतिवृष्टीचा ‘लाल बावटा’ जारी केला आहे.

**FPI इन्फ्लो**

विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी गेल्या महिन्यात 54 हजार 727 कोटी रुपये भांडवली आणि कर्ज बाजारामध्ये गुंतवले. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या आकडेवारीनुसार, या गुंतवणूकदारांनी भांडवलासाठी 32 हजार 364 कोटी रुपये आणि कर्जासाठी 22,363 कोटी रुपये गुंतवले. भक्कम आर्थिक दृष्टीकोन, दरांमधील कपात आणि सरकारी वित्तीय शिस्तीमुळे गुंतवणुकीचा हा भरीव प्रवाह येत असल्याचं अर्थतज्ज्ञांचं मत आहे.

**वायनाड**

केरळमध्ये वायनाडमधील भूस्खलनग्रस्त भागात मृतदेह शोधताना काल 16 मानवांचे अवशेष मिळाले आहेत. शोध मोहीम दिवसभरासाठी थांबवण्यात आली असून आज सकाळी पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. सशस्त्र दलाचे साडे बाराशेपेक्षा जास्त कर्मचारी बाधित भागात मदत आणि आपत्ती निवारण कार्यात सहभागी झाले आहेत. दुर्घटना झालेल्या ठिकाणी पर्यटनाला न जाण्याचं आवाहन मंत्रिमंडळाच्या उपसमितीने केलं आहे. मृतांचा शोध अंतिम टप्प्यात आल्यानं, आता विविध मदत छावण्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाकडं लक्ष केंद्रित केलं जात आहे. भूस्खलनातून वाचवलेल्या लोकांचं सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन केलं जाईल आणि त्यांच्यासाठी नवीन वसाहत बांधली जाईल असं मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी सांगितलं. 10,000 हून अधिक लोक या भागातील विविध शिबिरांमध्ये राहत आहेत. बाधित प्रदेशातल्या मुलांच्या मानसिक आरोग्य आणि उपचारांसाठी राज्याच्या आरोग्य विभागांनं 137 समुपदेशक तैनात केले आहेत.

**अवयवदान**

देशभरात चौदावा भारतीय अवयवदान दिन काल साजरा करण्यात आला. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या नोट्टो म्हणजे राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संघटनेनं नवी दिल्ली इथं यानिमित्त अवयव दान जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता. गेल्या दहा वर्षांत अवयवदानाचं प्रमाण चार पटीनं वाढून 18 हजार 378 झाल्याची माहिती यावेळी आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी दिली. दरम्यान, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने वायु, रस्ता, रेल्वे आणि जलमार्ग यासारख्या प्रवासाच्या विविध मार्गांद्वारे मानवी अवयवांची वाहतूक करण्यासाठी मानक कार्यप्रणाली जारी केली आहे. सरकारनं जारी केलेली ही मानक प्रणाली देशभरातील अवयव प्रत्यारोपणात गुंतलेल्यांसाठी मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून काम करतील.

**लोकअदालत**

सर्वोच्च न्यायालयानं 75  वं स्थापना वर्ष साजरं करण्यासाठी घेतलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले असल्याची  माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी काल दिली. या विशेष लोक अदालत उपक्रमाचा काल अखेरचा दिवस होता.

**क्रिकेट-भारत-श्रीलंका**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, भारत आज कोलंबो इथल्या आर. प्रेमदासा मैदानावर पन्नास षटकांच्या 3 सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्यामध्ये श्रीलंकेसोबत खेळेल. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सुरू होईल. रोमहर्षक पहिल्या सामन्यात दोन्ही संघांच्या समान धावा झाल्यामुळं ते बरोबरीत राहिले. त्यामुळं या सामन्यात विजय मिळवण्यासाठी त्यांच्यात चुरस राहील.

**ऑलिम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये, भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचा उपांत्य फेरीत अव्वल मानांकित आणि माजी विजेता डेन्मार्कचा व्हिक्टर एक्सेलसेन याच्यासोबत आज दुपारी साडेतीन वाजता सामना होईल. लक्ष्य विजयी झाला तर अंतिम फेरीत स्थान मिळेल आणि त्याचं पदक निश्चित होईल.टोकियो ऑलिम्पिकची पदकविजेती मुष्टियोद्धा लवलिना बोर्गोहेन महिलांच्या 75 किलो वजनी गटातील उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या ली कियानसोबत आज दुपारी तीन वाजता लढेल. पुरूष हॉकी संघ उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविण्यासाठी आज ग्रेट ब्रिटनसोबत दुपारी दीड वाजता मैदानात उतरेल. या विजयामुळे भारत सलग दुसऱ्या ऑलिम्पिकसाठी शेवटच्या चार संघांमध्ये पोहोचेल आणि पदकांच्या शर्यतीत असेल.दरम्यान, पॅरिसमध्ये भारताने आतापर्यंत जिंकलेल्या तिन्ही पदकांमध्ये योगदान दिलेल्या नेमबाजीत, राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते अनिश भानवाला आणि

विजयवीर सिद्धू 25 मीटर रॅपिड फायर पिस्तूलच्या पात्रता फेरीत भाग घेतील. पहिली पात्रता फेरी आज दुपारी दीड वाजता होणार आहे. ऍथलेटिक्समध्ये, पारुल चौधरी महिलांच्या 3000 मीटर स्टीपलचेसच्या पहिल्या फेरीत भाग घेईल, तर जेस्विन ऑल्ड्रिन पात्रता फेरीत आपल्या मोहिमेची सुरुवात करताना अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला भारतीय पुरुष लांब उडीपटू बनण्याचा प्रयत्न करेल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.